प्रकल्प अहवालास मान्यता देण्याबाबत.

सहकार महर्षी दादासाहेब रावल सहकारी सूतगिरणी मर्या., रावलगांव, दोंडाईचा ता. शिंदखेडा, जि. धुळे

महाराष्ट्र शासन
सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग
शासन निर्णय क्रमांकः . प्रकल्प - १२१९/प्र.क्र. २२/ टेक्स १ (ब)
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय (विस्तार), मुंबई ४०० ०३२.
दिनांक : ०३ सप्टेंबर , २०१९.

वाचा :-

१) शासन निर्णय, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, क्र.सुतगि ११९७/प्र.क्र.१९३/टेक्स-१, दि.२४.३.१९९९
२) शासन निर्णय, सहकार,पणन व वस्त्रोद्योग विभाग, क्र.सुतगि १२००/प्र.क्र.१५३/टेक्स-१, दि.१३.६.२०००
३) शासन निर्णय, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, क्र.सुतगि ११०८/प्र.क्र.९१/ टेक्स-१(अ),दि.३०.६.२०११
४) शासन निर्णय, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, क्र.सूतगि ३३१६/प्र.क्र.८१/ टेक्स-१(अ),दि.१०.७.२०१७
५) शासन निर्णय, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग क्र. धोरण-२०१८/प्र.क्र.१४०१/टेक्स-५, दि.१५.२.२०१८
६) शासन निर्णय,सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, क्र. सूतगि-३३१८/प्र.क्र.२०/टेक्स-१ (ब), दि. ८.३.२०१९
७) आयुक्त वस्त्रोद्योग,नागपूर यांचे पत्र क्र.कार्या ६(१)/सूतगि/ २११२/२०१९, दि.१४.३.२०१९

प्रस्तावना :-

सहकार महर्षी दादासाहेब रावल सहकारी सूतगिरणी मर्या., रावलगांव, दोंडाईचा ता.शिंदखेडा, जि. धुळे या सर्वसाधारण प्रवर्गातील सूतगिरणीची दि.८.३.२०१९ च्या शासन निर्णयान्वये शासन अर्थसहाय्यासाठी निवड करण्यात आली आहे. शासनाने दिनांक ३०.६.२०११ च्या शासन निर्णयान्वये, राज्यातील सहकारी सूत गिरण्यांच्या प्रकल्प अहवालाची सुधारीत किंमत रु.६१७४.२४ लाख इतकी निश्चित केली आहे. त्यानुसार या सुतगिरणीने महाराष्ट्र राज्य सहकारी वस्त्रोद्योग महासंघ, मुंबई यांचेकडून २५२०० चात्यांचा ५:४५:५० या आकृतीबंधानुसार प्रकल्प अहवाल तयार करुन घेतला असून आयुक्त वस्त्रोद्योग, वस्त्रोद्योग आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी दि.१४.३.२०१९ च्या पत्रान्वये सदर प्रकल्प अहवाल सुकाणू समितीच्या मंजूरीसाठी शासनास सादर केला. सुकाणू समितीच्या दिनांक २०.८.२०१९ रोजी झालेल्या बैठकीत सहकार महर्षी दादासाहेब रावल सहकारी सूतगिरणी मर्या., रावलगांव, दोंडाईचा ता. शिंदखेडा, जि. धुळे या सूतगिरणीच्या प्रकल्प अहवालात दर्शविलेल्या किंमतीबाबत चर्चा करुन सूतगिरणीच्या ५:४५:५० या आकृतीबंधानुसार असलेल्या प्रकल्प अहवालाची रु.६१७४.२४ लाख किंमत समितीने मान्य केली. त्याअनुषंगाने सहकार महर्षी दादासाहेब रावल सहकारी सूतगिरणी मर्या., रावलगांव, दोंडाईचा ता. शिंदखेडा, जि. धुळे या सूत गिरणीच्या रु.६१७४.२४ लाख एवढ्या प्रकल्प किंमतीस मंजूरी देण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

<u>शासन निर्णय</u> :-

सहकार महर्षी दादासाहेब रावल सहकारी सूतगिरणी मर्या., रावलगांव, दोंडाईचा ता. शिंदखेडा, जि. धुळे या खुल्या प्रवर्गातील सहकारी सुतगिरणीची शासन निर्णय, दि.८ मार्च, २०१९ अन्वये शासन अर्थसहाय्यासाठी निवड करण्यात आली आहे . सदर सूतगिरणीची प्रथमच प्रकल्प अहवाल किंमत निश्चित करण्यात येत असून शासन निर्णय दि.३०.६.२०११ अन्वये निश्चित केलेल्या रु.६१७४.२४ लाख इतक्या प्रकल्प अहवाल किंमतीच्या मर्यादेत या सूतगिरणीच्या २५२०० चात्यांच्या प्रकल्पास, त्या त्या बाबींसाठी मंजूर कमाल मर्यादेपेक्षा जास्त होणारा खर्च गिरणी स्वनिधी उभारुन करेल या अटीवर सदर सूतगिरणीच्या ५:४५:५० या आकृतीबंधानुसार रु.६१७४.२४ लाख इतक्या प्रकल्प किंमतीस खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून याद्वारे शासन मान्यता देण्यात येत आहे.

१) सूतगिरणीच्या कामासाठी कालबध्द कार्यक्रम (Time bound Program) आखून घ्यावा व त्यानुसार सूतगिरणीची उभारणी विहित कालावधीत करावी

२) शासन निर्णय दि.२४.३.१९९९ मधील सूतगिरणी परतफेडीस पात्र होण्याबाबतच्या अटीमध्ये दि.१०.०७.२०१७ च्या शासन निर्णयान्वये सुधारणा करण्यात आली असून सदरची सुधारणा या सूतगिरणीसाठी बंधनकारक राहील.

३) सूतगिरणीस निधी उभा करण्यासाठी कोणती बँक कर्ज देणार आहे, त्या बँकेचे कर्ज मंजूर करण्यात येत असल्याबाबतचे पत्र सादर करावे.

४) सूतगिरणीच्या कामकाजावर व प्रकल्प उभारणीवर लक्ष देऊन त्याबाबतचा तिमाही प्रगती अहवाल आयुक्त वस्त्रोद्योग, नागपूर यांनी विहित विवरणपत्रात शासनास सादर करावा.

५) सूतगिरणीचा प्रकल्प एक पथदर्शक प्रकल्प म्हणून उभा राहील याबाबत सूतगिरणीने तसेच आयुक्त वस्त्रोद्योग, नागपूर यांनी दक्षता घ्यावी.

६) सदर सूतगिरणी सर्वसाधारण प्रवर्गातील असल्याने शासनाने भविष्यात काही अटी/शर्ती घातल्यास त्या या सूतगिरणीवर बंधनकारक असतील.

२. सहकार महर्षी दादासाहेब रावल सहकारी सूतगिरणी मर्या., रावलगांव, दोंडाईचा ता. शिंदखेडा, जि. धुळे या सूतगिरणीचे सभासद भागभांडवल व शासकीय भागभांडवल यांचे प्रमाण १:९ असे राहील .त्यानुसार सूतगिरणीने पुढीलप्रमाणे निधी उपलब्ध करावयाचा आहे.

(रुपये लाखात)

अ)	सभासद भाग भांडवल (५%)	रु.३०८.७१
ब)	शासकीय भागभांडवल (४५%)	रु.२७७८.४१
क)	दीर्घ मुदती कर्ज (५०%)	रु.३०८७.१२
	एकूण	**रु.६१७४.२४**

सदर सूतगिरणीचा प्रकल्प किंमतीचा बाबनिहाय तरतुदीचा तपशील खालीलप्रमाणे राहील व त्यामर्यादेत गिरणीने खर्च करणे गिरणीस बंधनकारक राहील.

(रुपये लाखात)

अ.क्र.	तपशील	प्रकल्प अहवालानुसार मंजूर खर्च
१	जमीन व जमीन विकास	५८.०६
२	फॅक्टरी व इतर बांधकाम	१२१५.३०
३	प्लँट ॲन्ड मशिनरी	३१०२.७८
४	इतर कायम मालमत्ता	८४५.००
५	स्टोअर्स ॲन्ड स्पेअर्स	६१.००
६	प्रि ऑपरेटीव्ह खर्च	२०८.१६
७	कॉन्टीजन्सी	२७३.७७
८	मार्जीन मनी	४१०.१७
	एकूण	**६१७४.२४**

३. सूतगिरणीने रु.६१७४.२४ लाख इतक्या किंमतीमध्ये प्रकल्पाची उभारणी पूर्ण करावी. शासनाकडून देय भागभांडवलाची रक्कम निधीच्या उपलब्धतेप्रमाणे देण्यात येईल. प्रकल्प पूर्ण करण्यासाठी वरीलप्रमाणे त्या त्या प्रयोजनासाठी मंजूर किंमतीपेक्षा जास्त रक्कम खर्च झाल्यास जास्तीची रक्कम सूतगिरणीने स्वनिधीतून उभी करणे आवश्यक राहील. प्रकल्पावर अतिरिक्त होणारा खर्च सूतगिरणीला स्वत: करावा लागेल.तसेच यंत्रसामुग्री खरेदी व स्थापत्य बांधकामासाठी शासन निर्णय दि.१५.६.२००६ व दि.२८.३.२०१८ नुसार मान्यता घ्यावी. गिरणीच्या संचालक मंडळाने गिरणीच्या खर्चावर कडक नियंत्रण ठेवावे व अनावश्यक खर्च टाळावा.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०९०३१५११०१०८०२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने.

Prasenjeet Karlekar

Digitally signed by Prasenjeet Karlekar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Co- Operation Marketing and Textile, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=d219c43caa42a6d2c11a62256b2ff3ad939a420c9fb6fa0cb24c384214bcee8c, cn=Prasenjeet Karlekar
Date: 2019.09.03 15:21:35 +05'30'

(प्रसेनजीत कारलेकर)

कक्ष अधिकारी , महाराष्ट्र शासन

प्रत,

१. अपर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई-३२

२. अपर मुख्य सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२

३. सचिव (वस्त्रोद्योग), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
४. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.
५. आयुक्त वस्त्रोद्योग, वस्त्रोद्योग संचालनालय, महाराष्ट्र राज्य, नागपूर.
६. जिल्हाधिकारी, धुळे
७. प्रादेशिक उप आयुक्त, वस्त्रोद्योग, मुंबई.
८. जिल्हा उप निबंधक, सहकारी संस्था, धुळे.
९. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य सहकारी वस्त्रोद्योग महासंघ, मुंबई
१०. कार्यासन अधिकारी १६-स /सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
११. ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई (२ प्रतीत)
१२. अध्यक्ष, सहकार महर्षी दादासाहेब रावल सहकारी सूतगिरणी मर्या., रावलगांव, दोंडाईचा ता. शिंदखेडा, जि. धुळे (आयुक्त (वस्त्रोद्योग), नागपूर यांचेमार्फत)
१३. निवडनस्ती ,टेक्स-१(ब) /टेक्स-१ (अ).